| | | | |
|---|---|---|---|
| MHPU120006702021 | दाखल दिनांक | : | ०८/०९/२०२१ |
| | नोंदणी दिनांक | : | ०८/०९/२०२१ |
| | निकाल दिनांक | : | १३/०८/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०४ ११ ०५ |

**भोर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी सौ. मिना वामन जाधव )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२३५/२०२१. निशाणी क्र. ३१**

**गुन्हा नोंद क्र. ५१६/२०२१ राजगड पोलिस स्टेशन, पुणे**

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | : | **महाराष्ट्र शासन तर्फे<br>राजगड पोलिस स्टेशन, पुणे** |
| **अभियोगपक्षातर्फे प्रतिनिधीत्व** | :: | **सहा. सरकारी अभियोक्ता<br>श्री. वाय.एस.पोरे** |
| **आरोपी** | :: | **प्रकाश काळुराम साळवी<br>वय- ४० वर्षे, धंदा - व्यवसाय<br>रा. कापुरहोळ, ता. भोर, जि. पुणे** |
| **आरोपी तर्फे प्रतिनिधीत्व** | :: | **ॲड.श्री. लाड** |

**भाग – ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २९/०८/२०२१ |
| फिर्याद दाखल तारीख | २९/०८/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०८/०९/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ३०/०६/२०२२ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २२/०९/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याची तारीख | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय तारीख | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भातील आदेशाची तारीख | निरंक. आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोड ल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **प्रकाश काळुराम साळवी** | – | दि. ३०.०६.२०२२ | ६५ (ई) | निर्दोष | निरंक | निरंक |

**भाग – क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

**अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | योगेश लक्ष्मण राजीवडे | १४ सोबत | फिर्यादी |
| २. | गणेश बापुराव लडकत | १४ सोबत | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्ष –**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**अ.अभियोग पक्षामार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | पी.२३/पी.डब्ल्यु.१ | फिर्याद |
| ०२. | पी.२४/पी.डब्ल्यु.१ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ०३. | पी.२८/पी.डब्ल्यु.२ | जप्ती पंचनामा |
| ०४. | पी.२९/पी.डब्ल्यु.२ | रासायनिक विश्लेषणाकरीता पत्र |

**ब.बचाव पक्षामार्फत निशाणी –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क.न्यायालया मार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. भौतिक वस्तु**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**–:: न्या य नि र्ण य ::–**

(दिनांक १३/०८/२०२६ रोजी पारीत)

आरोपी हा महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हयाचे संपरीक्षेस सामोरे जात आहे.

०२. अभियोगपक्षातर्फे केवळ दोन साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने त्याच्या बचावाच्या पुष्ठ्यार्थ पुरावा सादर केलेला नाही. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ नुसार जबाब नोंदवला असून त्यामध्ये त्याने त्याचेविरुध्द खोटी केस केली असल्याचा व त्याचा काहीएक संबंध नसल्याचा बचाव घेतला आहे. अभियोगपक्षातर्फे श्री. पोरे वकील आणि आरोपीतर्फे श्री. लाड वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

०३. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा पाहता खालील प्रश्न माझ्या विचाराधीन येतात त्याचे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय की, दि. २९/०८/२०२१ रोजी १९.३० वाजण्याच्या सुमारास मौजे निगडे, आनंद नगर, ता. भोर, जि. पुणे येथे प्रस्तुत आरोपी ने त्याच्या ताब्यात रु. ४५०/– किमतीची देशी गावठी हातभट्टीची दारु साधानांसह विनापरवाना अनाधिकाराने बेकादेशीररित्या जवळ बाळगुन विक्री करत असताना मिळुन आला आणि त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे अपराध केला ? | **...नाही.** |
| ०२. | आदेश काय ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

**–:: <u>का र ण मी मां सा</u> :–**

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करीताः–</u>**

०४. अभियोगपक्षामार्फत सदर गुन्हा शाबीत करणेकामी फिर्यादी सा.क्र. १ योगेश लक्ष्मण राजीवडे आणि सा.क्र. २ गणेश बापुराव लडकत यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. दि. ०६.०४.२०२६ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०५. फौजदारी न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोगपक्षावर असुन अभिलेखावरील पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीस दिला जातो.

०६. भारतीय पुरावा अधिनियमानुसार आरोपीवरील अपराधाचे शाबीतीसाठी अभियोगपक्षाला साक्षीदारांच्या संख्येची आवश्यकता नाही. अभियोगपक्ष केवळ एका साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अपराध शाबीत करु शकतो. अभियोगपक्षास त्यानुसार अपराध शाबीत करण्यासाठी सादर केलेला साक्षीदाराचा पुरावा सक्षम व विश्वासाहर्य असायला पाहिले जेणेकरुन त्यावर विसंबून राहून अपराध शाबीत होत आहे याव्यतिरीक्त दुसरा निष्कर्ष काढता येणार नाही.

०७. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी सा.क्र.०१ योगेश लक्ष्मण राजीवडे यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, दि. २९/०८/२०२१ रोजी ते राजगड पोलिस स्टेशन अंतर्गत किकवी पोलिस दुरक्षेत्र येथे कार्यरत असताना पी.एस.आय. साबळे यांना गुप्त बातमी मिळाली की, निगडे गावचे हद्दीत आनंद नगर येथे रजपुत यांच्या घराच्या आडोशाला आरोपी विक्रम काळु साळवी हा अवैधरित्या दारु विक्री चालु आहे. सदर ठिकाणी र.रु. ४५०/– किमतीची हातभट्टीची दारु मिळुन आली, रासायनिक विश्लेषणाच्या अहवालाकामी प्लॅस्टीकच्या बाटलीमध्ये नमुना बाजुला काढण्यात आला आणि प्रस्तुत आरोपीविरुध्द नि.क्र. २३ प्रमाणे फिर्याद दिल्याचे कथन केले आहे.

०८. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या उलटतपासात हे कबुल केले आहे की, छापा टाकण्यापुर्वी त्यांना आरोपीचे नाव समजले होते, ज्या खाजगी वाहनाने गेले त्याचा क्रमांक, वर्णन इत्यादी नमुद नसल्याचे सांगितले, बोगस ग्राहक पाठवुन त्यांनी पुर्व खात्री केली नाही, जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला नाही, रिकाम्या बाटलीचा स्वतंत्र पंचनामा त्यांच्या समक्ष केला नाही. त्यांनी त्यांच्या उलटतपासात हे अमान्य केले की, आरोपीचे नाव समजल्याने छाप्याकामी न जाता पोलिस स्टेशन मध्ये बसुन त्यांनी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली.

०९. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा.क्र. २ गणेश बापुराव लडकत यांच्या पुराव्यात ते सन २०२१ मध्ये राजगड पोलिस स्टेशन अंतर्गत किकवी पोलिस दुरक्षेत्र येथे कार्यरत असताना गु.र.क्रमांक ५१६/२०२१ महाराष्ट्र प्रोहिबिशन कायदा कलम ६५ ई प्रमाणेच्या गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला. त्यावेळी पी.एस.आय. साबळे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे निगडे, अनंत नगर, अर्जुन रजपुत यांच्या घराच्या पाठीमागे एक इसम अवैध दारु विक्री करत आहे. त्यांनी दोन पंचांना बोलावुन स्टाफसह बातमी मिळालेल्या ठिकाणी ते गेले असता घटनास्थळावर विक्रम काळु साळवी हा इसम त्याच्या ताब्यात अवैध दारु विक्री करत असताना दिसुन आला. सदर आरोपी हा तेथुन पळुन गेला. नमुना मुद्देमाल सिलबंद करुन इतर मुद्देमाल नि.क्र.२८ वरील जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त केल्याचे कथन केले आहे. तसेच सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आल्यावर मुद्देमालाचा रिजनल फॉरेन्सीक सायन्स लॅबोरेटरी येथुन आलेला रिपोर्ट निशाणी क्र. ४ वर दाखल केलेला आहे.

१०. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात हे कबुल केले आहे की, छाप्याकामी ते घटनेच्या ठिकाणी गेले नाही. घटनाठिकाणावरुन कोण आरोपी पळुन गेला हे त्यांनी स्वतः पाहिलेले नाही. त्यांनी खाजगी वाहनासंबंधाने चौकशी करुन तसे कागदपत्रे पुरावा दोषारोपपत्रासह दाखल केलेले नाही. नमुना मुद्देमाल बाजुला काढण्यापुर्वी रिकाम्या बाटलीचा स्वतंत्र पंचनामा करण्यात आला नाही. तसेच सदर केसमधील पंच हे नेहमीचे पंच आहेत.

११. अभियोगपक्षाने कथनानुसार आरोपीच्या ताब्यात कथीत मुद्देमाल मिळाल्याबाबत सदर साक्षीदारांचे पुराव्याचे अवलोकन करता तफावत व विसंगती दिसून येते. तसेच अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांचा पुरावा न्यायालयासमक्ष सादर केला नाही.

१२. महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा शाबीत करणेकामी आरोपीच्या ताब्यात दारु सापडणे व ती योग्यरीत्या जप्त होणे आवश्यक आहे. फौजदारी दंड संहिताचे कलम १००(४) नुसार किमान दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या समक्ष सदरची जप्ती होवून ती न्यायालयात शाबीत होणे अनिवार्य होते. तपासी यंत्रणेने मिळालेल्या बातमीनुसार नियमावली अन्वये प्रत्येक अनिवार्य प्रक्रिया पाळून, त्यानुसार आवश्यक नोंदी करुन, घटनास्थळी जावुन, पंचासमक्ष पंचांसह छापा टाकून प्रतिबंधित माल जप्त करेपर्यंतची संपूर्ण श्रृंखला न्यायालयापुढे शाबीत करावयाची असते. तपासी यंत्रणेने सदर केसमध्ये छापा टाकण्यासाठी वापरलेल्या सरकारी वाहनाचा तपशिल, छापा टाकतेवेळेस असलेल्या कर्मचाऱ्यांचे टिपण, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा इत्यादी बाबी न्यायालयापुढे आणणे आवश्यक होते. जेणेकरुन अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांच्या कथनास दुजोरा मिळाला असता. अभियोगपक्षाने त्यानुसार पुरावा सादर केलेला नाही.

१३. महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) नुसार गुन्हा शाबीत करणेकामी प्रस्तुत आरोपीने त्याच्या ताब्यातुन र.रु. ४५०/– किमतीची देशी गावठी हातभट्टीची दारु विनापरवाना अनाधिकाराने बेकादेशीररित्या जवळ बाळगुन विक्री करत असताना मिळुन आला ही बाब अभिलेखावरील पुराव्यावरुन संशयापलिकडे जावुन सिध्द होवू शकलेली नाही. सबब, सबळ पुराव्या अभावी प्रश्न क्र.०१ करीता मी, नकारार्थी उत्तर देवून प्रश्न क्र.०२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

:: आ दे श ::

| | |
|---|---|
| ०१ | **आरोपी प्रकाश काळुराम साळवी** याची महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) मधुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ०२ | आरोपीने यापुर्वी दिलेले जामीन कदबे रद्द करुन त्यास खुले करण्यात येते. |
| ०३ | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये रुपये पन्नास हजार इतक्या रकमेचे नविन बंधपत्रे व जामिनपत्रे दाखल करावेत. |
| ०४ | सदर गुन्ह्यात जप्त मुद्देमाल दारु भरलेले कॅन विल्हेवाट आवाहन कालावधी संपल्यानंतर मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढुन घेतलेल्या वस्तू (विल्हेवाट) नियमन, १९५३ मधील तरतुदीस अधिन राहुन करावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लिहणेत व घोषित करण्यात आला.) |

JADHAV MEENA WAMAN
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2026.08.13 17:31:14 +0530

**ठिकाण : भोर** **( मीना वा. जाधव )**

**दिनांक :१३.०८.२०२६.** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भोर**

## <u>प्रमाणपत्र</u>

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | एम.डी.शिरोडे, नि.श्रे. |
| न्यायालयाचे नाव | - | मे. श्रीमती एम.व्ही. जाधव, प्र.वर्ग. न्या.दं. भोर |
| निकाल तारीख | - | १३.०८.२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याची तारीख | - | १३.०८.२०२६ |
| अपलोड केल्याची तारीख | - | १३.०८.२०२६ |